जागतिक शांतता व प्रगतीसाठी मराठी भाषा व साहित्यिकांचे योगदान

प्रा. डॉ. दिलीप महादू कोने.
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस,
जि. सांगली- ४१६३०८
मोबा.नं. ९९२२८८५१८६
Mail.ID. dilipkone
02@gmail.com

मराठी ही आमची मातृभाषा आहे. असे सर्वसामान्यपणे बोलले जाते ते ज्यांनी मराठी मातेच्या पोटी जन्म घेतला आहे. मातेची भाषा ही मुलाची भाषा असे आपण मानतो. माझ्या मते मात्यापित्याची भाषा ही मुलांची भाषा होते. मराठीत मातृभाषा व इतर काही देशामध्ये पितृभाषाही म्हटले जाते. पिता ज्या देशात काम करायला जातो तेथील ती भाषा होय. अर्थात याला काम /कर्म जिथे करतो त्या देशातील भाषा म्हणजेच कर्म भाषा होय. आधुनिक युरोपीय देशातील लोक काम करण्यासाठी इतर देशामधे गेले. त्याच देशांमध्ये मातृभूमी आणि पितृभूमी हा शब्दप्रयोग केला जातो. त्यातच मातृभाषा व पितृभाषा - यातील फरक स्पष्ट होतो. मराठी भाषा आज पितृभाषासुद्धा आहे. . ज्ञानेश्वर, नामदेवादी

कवी तत्वज्ञांच्या साहित्यातून विश्वात्मक संकल्पना मांडली गेली. संत ज्ञानेश्वरांनी तर पसायदानाच्या रूपाने विश्वात्मक मानव जातीचा जाहिरनामा मांडला आहे.

मराठी भाषा जगातील ११ व्या क्रमांकावर आहे. 'मराठी भाषेचे वाचक वर्ग ११ कोटी लोकसंख्येच्या प्रदेशात किती असेल हे जर प्रकाशकांच्या पुस्तक संख्येवरून पाहिले, तर विदारक अवस्था दिसेल. प्रकाशन संस्था, सरकारी साहित्य मंडळ अशा संस्थांमधून मराठीचा जागर चालू आहे. वार्षिक साहित्य संमेलने यांचे गणित मराठीचा तारू ढकलत असले तरी खरी वैश्विक मराठी ज्ञानोबा-तुकारामादी व इतर संतांनी परदेशात 'वैश्विक' रूपात पोहोचवली आहे. मराठी भाषिक जनाबाई, चोखा मेळा, सोयराबाई यांच्यासारखा दलित दुर्बळ, पतित लोकांच्या सहाय्याने भाषेत नवकळा आणली. १३ व्या शतकात चोखा मेळा यांनी लिहिलेले काव्य वाचल्यावर व्यक्त होण्याची उच्च कोटीची चपखळ परिसीमा जाणवते.

उदा. "अबीर गुलाल उधळीत रंग
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग
उंबरठ्याशी कैसे शिवू आम्ही जातीहीन,,
रूप तुझे कैसे पाहू त्यात आम्ही दीन"

वरील अभंगातील "उंबरठ्याशी कैसे शिवू आम्ही जातीहीन, रूपतुझे कैसे पाहू त्या आम्ही दीन" हया पदामध्ये संपूर्ण १२ व्या १३ व्या शतकाची दयनीय स्थिती उभी राहते. मानवीय भावनांना एकीकडे वाट करून देणारा भाव

आणि सामाजिक स्थिती उभे करणारे विधान जातीहीन' या शब्दाने निर्देशित केले आहे. आणि मनाची दोन अवस्थाही वर्णन केली आहे. देवाचे रूप पाहण्यासाठी अखंड मानवजात दीन आहे. हेही वैश्विक सत्य सांगून टाकले आहे. हा भाषेचा कस आहे. भाषा कशी समृद्ध होत जाते याचे उत्तम उदाहरण आहे. हे अतुलनीय आहे. तसेच सार्वत्रिकही आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानदेवी उर्फ भावार्थदीपिका लिहून मराठीबाहेरील ज्ञान मराठी भाषिकांना उपलब्ध करून दिले. तर नामदेवांचे अभंग पंजाबी व ब्रजभाषेत पोहोचले. हे भाषेचे प्रसरण आत-बाहेर या सदरात मोडते. तुकाराम महाराजांच्या गाथेने मराठी अभिव्यक्तीचा उच्चांक गाठलेला आहे. कवी म्हणून मानवाचे सर्व भावदर्शन नाते संबंधाचे जाळे, सामाजिक स्थिती, देव-माणूस हे द्वेत- अद्वैत सर्वांचा ऊहापोह गाथेत झाला आहे. मराठी अभिव्यक्तिचा दुसरा शिखर निर्माण करणारा मानवीय मानदंड तुकोबांची गाथा ठरलेला आहे. हे उदाहरण मराठीचे अंतर्भाग समृद्ध करणारे ठरले आहे.

'विसाव्या शतकात मराठीने ज्यांची भाषा मराठी नाही अशा अभ्यासकांचे लक्ष वेधले. इंग्रज राजवटीत मराठ्यांनी राज्य कसे विस्तारले याचा अभ्यास करता करता ग्रँट डफ सारखे इतिहासकार व प्रशासक भाषेच्या अंगाने चिकित्सक ठरले. १८६९ ची इंदुप्रकाशनाची तुकारामाची गाथा प्रसिद्ध झाल्यावर इतर भाषेतील भारतीय प्रांतातील लोकांचे लक्ष वेधले. यांची काळानुरूपे, माहिती 'तुकाराम दर्शन' यान सदानंद मोरे यांनी लिहिलेल्या ग्रंथरूप पुस्तकात मिळते.

तुकाराम गाथेला जसे अभ्यासक मिळाले. तसे अनुवादक मिळाले. युरोपियन देशातील जर्मन, फ्रेंच, डच, स्पॅनिष रशियन वगैरे भाषांमध्ये अनुवादकामुळे स्वैर आणि विद्यापीठीय भाषांतरे झाली. विसाव्या शतकाच्या मध्यानंतर आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात मराठी ज्ञान असलेल्या अभ्यासकांची एक फळीच निर्माण झाली. त्यातील भालचंद्र नेमाडे, अरुण कोलटकर, दि. पु. चित्रे यांनी तुकाराम गाथा व अनुभवामृत सारख्या पुस्तकातील काव्याचे भाषांतर हा वेगळा देशी. अविष्कार मराठीला वेगळा आयाम देणारा ठरला. तत्पूर्वी मराठीत केशवसुत, मर्ढेकर यांनी इंग्रजी शिक्षणाच्या आधार व इंग्लिश वाङ्मय प्रेमापोटी मराठी काव्यामध्ये नवजीवन ओतले-वाङ्मयाचा "परामर्श घेताना काव्यात १७ व्या शतकातील तुकोबांचे अभंग १८ व्या शतकातील मोरोपंतांच्या आर्या, श्लोक, रामदासांचे मनाचे श्लोक वगैरे यांचा उल्लेख येत असतो. पण हे आतील भाषांमध्ये काही प्रमाणात मोडते. तुकोबांच्या गाथेने मात्र वैश्विकतेला मिठी मारली. मानवतेला भाषा म्हणून आज २१ व्या शतकात तुकोबांच्या काव्याला मान्यता मिळाली आहे. मिळत राहिली आहे व मिळणार याची ग्वाही त्यांच्या शब्दामुळे मिळत राहते.

बा. सी. मर्ढेकरांनी काव्यात नवचैतन्याचे प्राण ओतले. नावीन्याचे वारे विसाव्या शतकाच्या मध्यावर वाहू लागले होते. साहित्य व सौंदर्य समीक्षेची सुरुवात त्यांनीच करून दिली आहे. सौंदर्यशास्त्र मराठीत पहिल्यांदा प्रस्तुत केले. मर्ढेकरांनी सौंदर्यशास्त्र प्रस्तुत करताना युरोपीय भाषांमध्ये आलेल्या नव चैतन्याचा संदर्भ देऊन मराठीत सौंदर्यशास्त्राबाबत मत मांडले हे 'बाहेरपण'

स्थानिकांना जरी खटकले तरी ही वैचारिक देवाण-घेवाण भाषेच्या विश्वात सतत होत राहिली. १२९७ च्या आसपास ज्ञानेश्वरी गीतेचे भाष्य वा भावार्थदीपिका, ज्ञानदेवी तदनंतर नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांच्या गाथा अशा मोजक्याच कलाकृती वैश्विक म्हणाव्या लागतात.

चित्र काढणारा शब्दाची कळा समजून काव्य करतो. अनेक कलाकार माध्यमांच्या मुबलकतेमुळे त्यांच्या भावनांना वाट करून देऊ लागले. त्यामुळे अनुभवांचे प्रशस्त पत निर्माण झाले आहेत. आजमितीला एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात 'डब्बल टैलेंट' असलेले अनेक कलाकार साहित्यिक कार्यरत झाले आहेत. अर्थात १९५० च्या दरम्यान ही दोन भाषेमध्ये लिहिणारे कवी, लेखक उदयास आले त्यात मराठीचे सौभाग्य उजळले. इंग्रजी सारख्या विषयात अरुण कोलटकर यांच्या 'जेजुरी' या इंग्रजीमधील कवितांना राष्ट्रकुल काव्य पुरस्कार प्राप्त झाला. हा मराठीचा गौरव आहे. 'जेजुरी' काव्यसंग्रहातील Butterfly कवितेला लंडन मेट्रो व रेल्वे मध्ये सार्वत्रिक ठिकाणी प्रदर्शित केले आहे. म्हणजे रेल्वे स्टेशनवर येणाऱ्या जाणाच्या प्रवाशांनी येताजाता जगभरच्या कवींचे काव्य वाचावे ही त्यामागील संकल्पना होती. तसेच- 'घाशीराम कोतवाल' सारखी नाट्यकलाकृती व 'ती फुलराणी' सारखी नाट्यकलाकृती जागतिक विषय मराठी झाले आणि मराठी विषय जागतिक झाले हे जे 'आत बाहेर होणे आहे' हीच वैश्विकता आहे. विषयाच्या अंगाने शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा अभ्यास व्हिएतनाम सारखा देश करतो आणि ते तंत्र अवलंब करून विसाव्या

शतकात जागतिक महासत्तेला नामोहरम करतो. हा मराठीच्या वैश्विकतेचा एक भाग आहे. मराठी भाषा म्हणून फैलावतेच पण त्यातील तंत्रही वैश्विक आहे.

भाषेचे वैश्विक रूप डिजीटल काळात तर जास्तच विस्तृत झाले आहे. भाषा रचनाकारांना त्यात सामावून घेता आले. र. कृ. जोशी सारखे कलाकार मराठीची लिपी अंकान करताना गुगल सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना जागतिक भाषेतील अनेक रचनाकार सामील करून घ्यावे लागले. र. कृ. जोशींनी मराठी मंगल टाईप विकसित केलेला आहे. अशा मराठी भाषेच्या प्रांतात भाषा कलातंत्र हा एक महत्त्वाचा भाग भविष्यात होणार आहे. त्याची चाहुल अरुण कोल्हटकर, दि. पु. चित्रे यांच्यासारख्या बहुआयामी कवी व चित्रकार असणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना १९६० च्या दशकाच्या अगोदर आली होती. आज मराठीत जगभर मराठी कथा, कादंबऱ्या, नाटक, चित्रपट पाहण्याची सोय झाली आहे. संकेतस्थळावरून मराठी खाद्यपदार्थाची रेलचेल दाखविली जाते. पूर्वी संकेताची भाषा होती, चिन्हांची भाषा होती. आता प्रत्यक्ष प्रसंगांची भाषा व्हिडिओ रूपाने प्रत्येकाच्या हातात येते. फेसबुक आणि व्हॉट्सअप सारखी सामाजिक स्थळे अतुलनीय, अजोड, विलक्षण, विचित्र, अद्वितीय असे सर्व जे काही आहे. ते सार्वत्रिक होत आहे. या सार्वत्रिक होण्याने मराठी, मराठी म्हणूनच इतरत्र पाहिले जाते. कारण जागतिकीकरणात मराठीचे मराठीपण टिकून ठेवणाऱ्या गोष्टी, बाबी, मुद्दे नक्कीच आहेत. कला क्षेत्रातसुद्धा तैलचित्र जी वासुदेव गायतोंडे यांनी रंगविली आहेत, ती जगप्रसिद्ध तर आहेच. त्यांची तौलनिक किंमतही वैश्विकतेची मांड घालून बसली आहे. हे सर्व १९४० ते ५० साला- नंतरची क्षेत्रे उदयास आली.

पुढील 20 वर्षात भाषेचा पट आणखीन बदलेल असे भाकीत भाषाशास्त्रज्ञ, गणेश देवी यांनी नमूद केले होते. आणखी कलेच्याच अंगाने महत्त्वाचा मुद्दा असा की, मुकुंद गोखले या लिपी शास्त्रज्ञाने गोंड भाषेची लिखित लिपी विकसित करण्यास हातभार लावला आहे. गोंड भाषा आता छापील स्वरूपात वाचता येते. हे 20 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात शक्य करून दिले. हे अंतरशोध मराठी भाषेला पूरक ठरणारे असे मुद्दे आहेत. जे काव्य आणि साहित्यात भर टाकणारे असतात. महत्वाची बाब ही आहे की, र. कृ. जोशी, मुकुंद गोखले हे लिपी रचनाकार स्वतः कवी होते. हे नमूद करणे महत्वाचे आहे. भाषा विस्तृत आहे. विषय माध्यमांमुळे वाढत आहेत. माध्यमे विज्ञानामुळे बदलत आहेत. जग हेच एक ठिकाण झाले आहे. विज्ञान यात्रेच्या प्रवासात त्यामुळे भाषा लोप पावणार नाही, तर त्याचे स्वरूप बदलणार आहे.

स्थानिक मागासलेल्या परिस्थितीतून येऊन आणि मार्क्सवादी विचारसरणीचा पगडा असलेला अण्णा भाऊ साठे यांना भारत सरकारतर्फे सोव्हिएत रशियाला जाण्याची सांस्कृतिक दौऱ्याची संधी मिळाली होती. अण्णा भाऊ साठे यांच्या मराठीतील कादंबरीच्या १७ भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. भारताबाहेरील विद्यापीठांमधील 'मराठी भाषेचा' तसेच भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रात दाखल झाले होते त्यापैकी गी. दलरी फ्रांसमधून १९६० च्या दशकात पुण्यात कार्यरत होते. त्यांनी नामदेवांचे अभंग फ्रांसमध्ये भाषांतरित केले आहेत. लोथर लुत्से हे जर्मन अभ्यासक हिंदी भाषेचा अभ्यास करत होते पण त्यांनी अरुण कोलटकर यांची 'जेजुरी' जर्मन मध्ये

संकलित केली आहे . या पुस्तकासाठी सोन्थायमर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. गुंथर सोन्थायमर है हैडलबर्ग येथील जर्मन विद्यापीठाचे स्कॉलर, इडीओलॉजीचे विभागप्रमुख होते. त्यांनी अरुण कोलटकर, नामदेव ढसाळ यांच्या मराठी कविता जर्मन भाषेत भाषांतरित केलेल्या आहेत. 'अमेरिकन ॲन फिल्डहाऊस, प्रोफेसर ऑफ रेलीजीअस स्टडीम' यांनी महाराष्ट्र कर्मभूमी म्हणून स्वीकारली. 'पाणी आणि स्त्रीपण- १९९५ त्या वर्षात प्रकाशित केले आहे. ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस तर्फे प्रकाशित झाले आहे. इरिना ग्लुशकोवा या रशियन आहेत. या भारतीय नागरिकत्वं स्वीकारलेल्या, NGO व प्रगत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक शाळेत भाषेच्या माध्यमातून कसे घडे द्यायचे यांचे प्रायोगिक तत्वावर आणि प्रत्यक्ष शिक्षण कसे द्यायचे हे पाहतात. तिने संत ज्ञानेश्वर आणि महाराष्ट्रातील वारकरी परंपरा यावर संशोधन केले आहे. तिला महाराष्ट्र टूरीझम आणि संस्कृती विभागाची राजदूत (Ambasider) म्हणून नेमले आहे. असे संशोधक, अभ्यासक मराठीच्या वैश्विकतेचा प्रचार व प्रसार करत आहेत.

मॉरिशिअस देशात मराठी बोलणा-यांची संख्या देशाच्या लोकसंख्येत १% टक्क्याच्या आसपास येते अशी माहिती मिळते. ही भाषा तिथे कशी पोहचली याचा अभ्यास केल्यावर लक्षात येते.. १८८५ ते १९१६ या काळात भारतीय मजुरांची भरती ब्रिटिश राजवटीत झाली. जगात माणसाला गुलाम म्हणून ठेवण्याची पद्धत नामशेष केल्यावर ब्रिटिश व तत्सम साम्राज्य असलेल्या राजवटींनी आपसात करार करून मजूर भरती केली. हे करारनामी मजूर म्हणून गणले जातात. करार हा ५ वर्षाचा असे. गोपाळ कृष्ण गोखले यांनी हा कायदा

१९२० पासून रद्दबातल ठरविला व भारतीय नागरिक मजूर म्हणून पाठविणे ब्रिटिश राजवटीने थांबविले. पाच वर्षानंतर मजूर स्वदेशी येऊ शकत असे पण बहुसंख्य मजुरांनी जिथे काम आहे तिथेच उदरनिर्वाह करण्याचा मार्ग स्वीकारला. मुंबईतून मॉरिशिअस येथे गेलेल्या मराठी मजुरांनीही हा मार्ग स्वीकारला. त्यामुळे मराठी भाषा तिथे बोलली जाते आहे.

भाषा एक संक्रमण आहे, संघटनही आहे. शब्दांचे तसेच स्वरांचे व लयीचे संमोहनही आहे. काव्य आणि साहित्यात येणारे शब्द अक्षरसंच व समूह अर्थाची निर्मिती करताना व्याकरण - समिश्रीत भाषा उदयास आली. ७० हजार वर्षापूर्वी भाषेतून देवाण- घेवाण सुरु झाली. हातवारे, खुणांची भाषा उदयास आली. भाषा नदीसारखी आहे. उगमाला ती अवखळ वाटते पण तिचा मार्ग जसजसा क्रमित होत राहतो तशी ती येईल तो भूभाग ओला करत राहते. तशीच आषाही जाईल त्या प्रांतात शब्दाचे बदल करत राहते - मिश्र होत जाते. स्वतः मिश्रण स्वीकारते. प्रांतवार नदीची नावे बदलतात तर प्रांतवार भाषेचे शब्द व अर्थही बदलतात- भाषेत मानवी- मूल्यांचे अनेक पैलू समाविष्ट झालेले असतात. नदी आणि भाषा यात अनेक साम्यस्थळे आहेत.

समारोप :

भाषेला स्थळा- काळाचे बंधन नसते. भाषा ही संक्रमित होत असते. साहित्याच्या रुपाने आपली संस्कृती परदेशात जाते व परदेशातील संस्कृती इथे

येते. म्हणजे संस्कृतीचे आदानप्रदान होत असते. चांगल्या ग्रंथांचे भाषांतर होते. ज्ञानेश्वरांनी साहित्याच्या रूपाने विश्वात्मक संकल्पना मांडून पसायदानातून विश्वाचे कल्याण इच्छिले आहे. म्हणून तर 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती' असे म्हटले जाते. जागतिक शांतता व प्रगतीसाठी भाषा व साहित्यिकांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

संदर्भग्रंथ :

१.भालचंद्र नेमाडे - 'साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण' लोकवाङ्मय गृह, मुंबई- २००३

२.अरुण शिंदे - 'आधुनिकीकरण व जागतिकीकरणाचा बोली भाषांवरील परिणाम' नव अनुष्टुभ - २०११'

३ जगन कराडे - जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' डायमंड पब्लिकेशन, पुणे- २००८.

४ रंगनाथ पठारे - जागतिकीरण आणि देशीवाद', लोकवाङ्मय गृह, 'मुंबई- २००३.